# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे – ४११ ०१६

☎(020)25656234, FAX : (020)25656234

ईमेल : ropune@dtemaharashtra.gov.in संकेतस्थळ : www.ropune.org.in

जा.क्र. तंशिविकापु/विवि/DBT २०१८-१९/ 4087 दिनांक : १९/०९/२०१८

19 SEP 2018

प्रति,

संचालक / प्राचार्य,
सर्व तंत्रशिक्षण संस्था,
पुणे विभाग

विषय :- DBT PORTAL मध्ये INSTITUTE PROFILE APPROVE करणेबाबत.....

संदर्भ :- तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/ईबीसी/डीबीटी पोर्टल/२०१८/३२० दिनांक १९/०९/२०१८

पुणे विभागातील सर्व तंत्रशिक्षण संस्थांच्या संस्थाप्रमुखांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता तंत्रशिक्षण संचानालयामार्फत राबविण्यात येणा-या १. **राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २.डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना व ३. राज्य सरकारची अल्पसंख्यांक योजना या तीन योजनांचा समावेश** DBT PORTAL मध्ये करण्यात आला आहे.

या अनुषंगाने सर्व संस्थांना लॉगीन आयडी व पासवर्ड ईमेलद्वारे पाठविण्यात आले आहेत. तसेच सर्व संस्थांनी http://mahadbtmahait.gov.in/ या वेब पोर्टलवर लॉगीन करुन संस्थेचे प्रोफाईल / फी बाबतची माहिती त्वरित अद्ययावत करण्याबाबत यापुर्वीच या कार्यालयाने सुचित केले आहे.

या अनुषंगाने सर्व संस्थांना सुचित करण्यात येते की, संस्थांचे प्रोफाईल / शुल्काबाबतची माहिती (सर्व शुल्क व परीक्षा शुल्क ) तपासणीसाठी खाली नमुद केल्या प्रमाणे त्यांच्या जिल्हयासाठी नेमुन दिलेल्या तारखेस आवश्यक कागदपत्रांसह (**AICTE EOA, University / MSBTE Exam.Fee Circulars etc.**) उपस्थित राहुन विभागीय कार्यालयाच्या प्रतिनिधींकडुन प्रोफाईल / शुल्काबाबतची माहिती ऑनलाईनरित्या मंजुर करुन घ्यावी.

| अ.क्र. | संस्थांचे विवरण | तपासणीचा दिनांक | तपासणी साठी उपस्थित राहण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | पुणे जिल्हयातील सर्व संस्था | दिनांक २१/०९/२०१८ ते दिनांक २५/०९/२०१८ (दिनांक २३/०९/२०१८ वगळुन) | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे |
| २. | सोलापुर जिल्हयातील सर्व संस्था | दिनांक २०/०९/२०१८ 20/09/2018 20th Sept. 2018 | वालचंद इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलाजी, सोलापुर |
| ३ | सातारा जिल्हयातील सर्व संस्था | दिनांक २२/०९/२०१८ 22/09/2018 22nd Sept. 2018 | केबीपी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सातारा |
| ४ | सांगली जिल्हयातील सर्व संस्था | दिनांक २४/०९/२०१८ | वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सांगली |
| ५ | कोल्हापुर जिल्हयातील सर्व संस्था | दिनांक २५/०९/२०१८ व दिनांक २६/०९/२०१८ | शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापुर |

विहित वेळेत याबाबतची कार्यवाही पुर्ण न केल्यास आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : १. संचालक, वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सांगली
२. प्राचार्य, वालचंद इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलाजी, सोलापुर/ केबीपी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सातारा / शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापुर यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६१७९६९ , फॅक्स - २२६९०००७

E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


FC

ईमेलद्वारे / तात्काळ

क्रमांक :१८/तशिसं/ईबीसी/डीबीटी-पोर्टल/२०१८/३२०

दिनांक : १९/०९/२०१८

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाराष्ट्र शासनाच्या नव्याने सुरु करण्यात आलेल्या आपले सरकार डीबीटी पोर्टल बाबतची माहिती विभागांतील सर्व संस्थांना देण्यासाठी ओरिएंटेशन / ट्रेनिंग प्रोग्रॅम **(Orientation Prorgramme of Aaple Sarkar DBT Portal for 2018-19)**

संदर्भ :- १. या कार्यासनाचे पत्र क्रमांक :१८/तशिसं/ईबीसी/२०१८/२९३ दिनांक : २०/०८/२०१८

२. या कार्यासनाचे पत्र क्रमांक :१८/तशिसं/ईबीसी/२०१८/३०३ दिनांक : २७/०८/२०१८

३. या कार्यासनाचे पत्र क्रमांक :१८/तशिसं/ईबीसी/२०१८/३१६ दिनांक : १२/०९/२०१८

सन २०१८-१९ करिता महाराष्ट्र राज्य शासनाच्या ३७ योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय (डी.आय.टी.) यांचेकडून, आपले सरकार डी.बी.टी पोर्टल (संकेतस्थळ : **http://mahadbtmahait.gov.in** ) बनविण्यात आलेले आहे. त्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या खालील योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना ( भाग-१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून )

तरी आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संस्थांचे प्राचार्य, संस्था स्तरावरील योजनांचे शिष्यवृत्तीचे काम ऑनलाईन पाहणारे अधिकारी / कर्मचारी यांना आपल्या कार्यालयामार्फत बोलावून पोर्टलबाबतचा Orientation Programme आयोजित करुन संस्थांना पोर्टलबाबतची माहिती द्यावी. तसेच सर्व संस्थांना त्यांना प्राप्त झालेल्या पोर्टलबाबतच्या लॉगीन क्रिडेन्शिअल्सचा वापर करुन संस्थेबाबतची अचूक माहिती ( प्राचार्यांचे नांव, अभ्यासक्रम व अभ्यासक्रमांना लागू असलेले सर्व शुल्क व परीक्षा शुल्क ) ऑनलाईनरित्या अद्ययावत करुन मंजूरीसाठी दि. २५/०९/२०१८ तारखेच्या आत पाठविण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच,

विभागीय कार्यालयाकडे मंजूरीसाठी प्राप्त झालेल्या संस्थांचे ऑनलाईन प्रस्ताव प्रलंबित न ठेवता तपासणी करुन मंजूर करावे ( जेणेकरुन योजनाचा लाभ रिप्-लेक्ट होईल ) अथवा संस्थांचे ऑनलाईन प्रस्ताव चूकीचे असल्यास संस्थेला कळवून ऑनलाईनरित्या परत पाठवावे व संबंधित संस्थांना अचूक प्रस्ताव परत ऑनलाईनरित्या जमा करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. विभागीय कार्यालयाने संस्थांनी करावयाची कार्यवाही दि.२७/०९/२०१८ च्या आत पूर्ण होईल यादृष्टीने याबाबतचे Orientation Programme चे आयोजन करुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयाला पाठविण्यात यावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.